नवीन खाजगी प्राथमिक, उच्च प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा सुरु करण्यासाठी प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांची तपासणी , छाननी करण्यासाठी जिल्हास्तरीय समिती व राज्यस्तरीय समिती यांची पुनर्रचना करण्याबाबत .....

# महाराष्ट्र शासन

## शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

## शासन निर्णय क्रमांकः एचएससी-१८१२/(३२३/१२)/उमाशि - १

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग

मंत्रालय, विस्तार भवन,मुंबई-४०० ०३२

तारीख: **१७ जून, २०१३.**

वाचा —

१) शासन निर्णय क्रमांकः शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक: नमाशा - १००४ /(३५३/०४)/माशि-१, दिनांक १९ जुन, २००४

२) शासन निर्णय क्रमांकः महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२

३) शासन निर्णय क्रमांकः शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्रमांक नमाशा / बृआ / १३-१४ / ६१०८० / १५ क (०५) / ४९१७, दिनांक १७/०५/२०१३.

प्रस्तावना —

याचिका क्रमांक १७७३/२००० मध्ये मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार नवीन माध्यमिक शाळांच्या प्रस्तावांची जिल्हा समिती व राज्य समितीद्वारे तपासणी करण्यासाठी जिल्हास्तरीय

समिती व राज्यस्तरीय समिती गठीत करण्याचे आदेश देण्यात आले होते. त्यानुसार संदर्भाधीन दिनांक १९ जून, २००४ च्या शासन निर्णयान्वये या दोन्ही समित्यांची रचना करण्यात आली होती. सदर दोन्ही समित्यांमध्ये विभागीय शिक्षण उपसंचालक व शिक्षण संचालक (प्राथमिक) यांचा समावेश नसल्याने प्रशासकीय अडचणी येत होत्या. सदर बाब विचारात घेऊन बृहत आराखडयानुसार व महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ नुसार एकसुत्रता आणण्याकरीता **नवीन खाजगी प्राथमिक, उच्च प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा** सुरु करण्यासाठी प्राप्त होणा-या प्रस्तावांची तपासणी, छाननी करण्यासाठी जिल्हास्तरीय समिती व राज्यस्तरीय समिती यांची पुनर्रचना करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय—

नवीन खाजगी प्राथमिक, उच्च प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा सुरु करण्यासाठी प्राप्त होणा-या प्रस्तावांची तपासणी, छाननी करण्याकरीता दिनांक १९ जुन, २००४ च्या शासन निर्णयान्वये गठीत करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय समिती व राज्यस्तरीय समिती तसेच महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ (२०१३ चा महा.१) याच्या कलम ६ च्या पोट-कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, नवीन शाळा स्थापन करण्यासाठी किंवा विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी परवानगी देणेबाबत जिल्हास्तरीय छाननी समिती व जिल्हा व विभागीय स्तरावरुन शिक्षण संचालनायालकडे प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांची छाननी करण्यासाठी राज्यस्तरीय छाननी समितीची खालीलप्रमाणे पुनर्रचना करण्यात येत आहे:-

<u>जिल्हास्तरीय छाननी समिती</u>

१.संबंधित विभागाचा विभागीय शिक्षण उपसंचालक - अध्यक्ष

२. संबंधित जिल्ह्याचा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) - सदस्य

३. संबंधित जिल्ह्यासाठीच्या जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचा प्राचार्य-सदस्य

४. संबंधित जिल्ह्याचा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) - सदस्य

५. संबंधित जिल्ह्याचा उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक) - सदस्य- सचिव

<u>राज्यस्तरीय छाननी समिती</u>

१. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) - अध्यक्ष

२. शिक्षण संचालक (प्राथमिक) - सदस्य

३. संचालक, म.रा.शै.सं. व प्र.परिषद - सदस्य

४. शिक्षण सहसंचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) - सदस्य-सचिव.

२. वरीलप्रमाणे पुर्नरचित करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय छाननी समिती व राज्यस्तरीय छाननी समिती यांनी यापुढे शासनाकडून बृहत आराखडयानुसार व महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ नुसार नवीन खाजगी प्राथमिक, उच्च प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा सुरु करण्यासाठी प्रस्ताव मागविल्यानंतर प्राप्त होणा-या प्रस्तावांची तपासणी, छाननी करून सदर छाननी समितीत्यांनी खालीलप्रमाणे दर्शविलेल्या वेळापत्रकानुसार कार्यवाही करणे आवश्यक राहील :-

१) संबंधित अर्जदाराकडून अर्ज प्राप्त झाल्यानंतर सर्व मूळ अर्जांची व सहपत्रांची तपासणी करणे, आवश्यकता वाटल्यास प्रत्यक्ष तपासणी करुन घेणे, अर्जदाराची सर्व कागदपत्रे व जिल्हास्तरीय छाननी समितीचे अभिप्राय व प्राथमिक शिफारशी विभागीय शिक्षण उप संचालक यांनी त्यांच्या अथवा शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) किंवा शिक्षण संचालक (प्राथमिक) यांच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करुन १५ दिवसात जनतेकडून हरकती / आक्षेप /सूचना इत्यादी मागविणे.

२) जनतेने ई-मेल, पत्राव्दारे किंवा संबंधित जिल्हास्तरीय छाननी समितीचे अध्यक्ष / सदस्य-सचिव यांना समक्ष भेटून हरकती /आक्षेप/सूचना विहीत मुदतीत सादर करता येतील. विहित मुदतीनंतर प्राप्त झालेल्या हरकती / आक्षेप /सूचना विचारात घेतल्या जाणार नाहीत.

३) वरील मुद्दा क्रमांक १ येथे नमूद केल्याप्रमाणे अर्जदाराने दिलेल्या माहितीची प्रत्यक्ष पडताळणी किमान वर्ग-२ च्या अधिका-यांकडून करणे बंधनकारक राहील.

४) जनतेकडून प्राप्त झालेल्या सर्व हरकती /आक्षेप/सूचना इत्यादींचा विचार करुन जिल्हास्तरीय छाननी समितीने अंतिम शिफारशीसह प्रस्ताव १० दिवसाच्या आत शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) यांच्या अध्यक्षतेखालील राज्यस्तरीय छाननी समितीकडे पाठविणे आवश्यक राहील.

५) जिल्हास्तरीय छाननी समितीकडून प्राप्त झालेले प्रस्ताव शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) यांनी संकेतस्थळावर प्रदर्शित करुन १५ दिवसात जनतेकडून हरकती / आक्षेप / सूचना इत्यादी मागवतील.

६) जनतेने ई-मेल, पत्राव्दारे किंवा राज्यस्तरीय छाननी समितीचे अध्यक्ष / सदस्य-सचिव यांना समक्ष भेटून हरकती /आक्षेप / सूचना विहीत मुदतीत सादर करता येतील. विहित मुदतीनंतर प्राप्त झालेल्या हरकती / आक्षेप / सूचना विचारात घेतल्या जाणार नाहीत.

७) वरीलप्रमाणे जनतेकडून प्राप्त झालेल्या हरकती / आक्षेप / सूचना विचारात घेवून राज्यस्तरीय छाननी समिती पुर्नछाननी करून व त्यांच्या शिफारशीसह प्रस्ताव संकेतस्थळावर प्रदर्शित करतील.

८) सदर प्रस्ताव राज्यस्तरीय समितीच्या शिफारशीसह प्रस्ताव १० दिवसाच्या आत शासनाकडे सादर करणे बंधनकारक राहील.

९) जिल्हास्तरीय छाननी समिती व राज्यस्तरीय छाननी समिती यांनी त्यांच्या शिफारशीसह शासनास सादर केलेले प्रस्ताव शासनस्तरावरून तपासणी करून दिनांक ५ डिसेंबर, २०१२ च्या शासन निर्णयान्वये विहीत करण्यात आलेल्या कार्यपध्दती व निकषानुसार पात्र ठरणा-या शाळांची यादी संकेतस्थळावर प्रसारीत करील व शासनस्तरावरून संस्थांना शाळा सुरू करण्यासाठी प्रथम हेतूपत्र (Letter of Intent) व तदनंतर परवानगी (Letter Of Approval) देण्यात येईल.

३. सदर आदेश हे बृहत आराखडयानुसार व महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ नुसार खाजगी व स्वयंसेवी संस्थांमार्फत सुरू करण्यात येणा-या नवीन प्राथमिक, उच्च प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना तसेच सिमावर्ती भागातील शाळांना परवानगी देण्याकरीता लागू राहतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१३०६१७१५०७०८३६२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Prakash Krishnrao Thube

Digitally signed by Prakash Krishnrao Thube
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=School Education & Sports Dept, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Prakash Krishnrao Thube
Date: 2013.06.18 11:43:18 +05'30'

**(प्रकाश ठुबे)**

**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. शिक्षण संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. शिक्षण संचालक, (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
३. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे.
४. संचालक, महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.
५. प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मंबई.
६. विभागातंर्गत सर्व संचालक.
७. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
८. सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक.
९. सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक( जिल्हा परिषदा
१०. सर्व शिक्षण निरीक्षक (पश्चिम / उत्तर / दक्षिण) बृहन्मुंबई.
११. मा. मंत्री, (शालेय शिक्षण( यांचे खाजगी सचिव [प्रति घेणा-यांचे नाव लिहा]
१२. मा. राज्यमंत्री, (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव.
१३. सर्व सहसचिव / उपसचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग.
१४. निवडनस्ती उमाशि - १.